| MHOS130008422020 | **रे.दि.दा.नं.३८२/२०२० मधील निशाणी क्र.२१ वरील आदेश**<br>**(निलावती जगन्नाथ औताडे वि. उषा बबन चव्हाण)**<br>*CNR No. MHOS13-000842-2020* |
|---|---|

१. प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज कैफियत व म्हणणे दाखल करण्यात झालेला विलंब माफ करून कैफियत व म्हणणे दाखल करून घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे म्हणणे आहे की, सदर प्रकरणातील प्रतिवादी प्रकरणी दि.२०. ०३.२०२१ रोजी वकीलामार्फत हजर झाले आहेत. परंतु भारत सरकारच्या कोव्हीड प्रतिबंधक उपाययोजणेचा भाग म्हणून संपुर्ण देशात लॉकडाउन होते म्हणून प्रतिवादीस काही महत्वाची कागदपत्रे न मिळालेमूळे कैफियत व म्हणणे मूदतीत दाखल करता आला नाही. सदर कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब हा हेतुपरस्कर/जाणून बुजुन झालेला नाही. त्याकरीता न्यायालयाने आज रोजी प्रतिवादीतर्फे कैफियत व म्हणणे दाखल करून घेणे न्याय व योग्य आहे.

३. प्रस्तुत अर्जावर वादीचे म्हणणे घेण्यात आले. अर्जातील विधाने खरी नाहीत. प्रतिवादी यांनी मूददाम कैफियत दाखल केला नाही. कोव्हीड बाबतच्या सवलतीचा फायदा घेवून प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न केला आहे. अर्ज रदद करण्यात यावा किंवा प्रतिवादीवर कॉस्ट आकारण्यात यावेत अशी विनंती केली.

४. मी प्रतिवादी व वादी यांचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादी यांच्यामधील प्रस्तुत दावा जमीन गहाण मूक्त करून मालकीची घोषणा व ताबा मिळणेसाठी आहे. वादी व प्रतिवादी यांना त्याचे म्हणणे मांडण्याची समान संधी देणे आवश्यक आहे. प्रकरण स्थावर मालमत्तेच्या बाबत ताबा मागीतला असल्याने प्रतिवादीचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक दिसते. त्यावरून दावा गुणदोषावर निकाली काढणे सोयीस्कर होईल. तसेच प्रतिवादीची म्हणणे ऐकूण घेवून त्यांना कैफियत देण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायास धरुन होईल. तसेच दरम्यानच्या काळात कोरोनामूळे ताळेबंदी होती हे लक्षात घेणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश :—

**आ दे श**

१) प्रतिवादीचा **निशाणी २१** वरील अर्ज मंजूर करण्यात येतो व प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेण्यात येते.

स्वाक्षरीत/—

दिनांक : ११/१०/२०२१.

**(डॉ. डी. जी. पटवे)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

**Certificate**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | ... | Smt. R.H.Botre |
| Court | ... | 2nd Jt.CJJD &JMFC Bhoom |
| Date | ... | 11-10-2021 |
| Order signed by the Presiding Officer on | ... | 11-10-2021 |
| Order uploaded on | ... | 11-10-2021 |